संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# प्रजासत्ताकाचे 'आवाहन आणि आव्हान'

**समाजजीवनाचे** चैतन्य हे त्याच्या मूलभूत स्वातंत्र्यामध्ये दडलेले असते.परंतु त्या चैतन्याची राज्यकर्त्यांना जाणीव राहावी म्हणून संविधानासारख्या व्यवस्थांची निर्मिती करावी लागते. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने आपल्या प्रजासत्ताकाची घोषणा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय परिश्रमाने तयार केलेल्या संविधानामुळेच आज सामाजिक एकात्मता आणि राष्ट्रीय कर्तव्यांबरोबरच जबाबदारीचे भान टिकून राहू शकले. संविधानाने दिलेले हे आश्वासनच आज देशाला किंवा समाजाला नित्य चैतन्याचा अनुभव देत आले. परंतु ज्याप्रमाणे निसर्ग किंवा सृष्टीमध्ये असलेल्या चैतन्याची मनुष्याला तितकीशी जाणीव होत नाही. किंवा त्याचे महत्व वाटत नाही. तशीच काहीशी परिस्थिती या संविधानाविषयी झाली आहे. कारण संविधानाने सामान्यांच्या जीवनाच्या सुरक्षिततेला महत्व दिले. आणि या जनतेच्या हक्कांचे अधिकारांचे संवर्धन करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांवर टाकली होती. राज्यकर्त्यांनी मात्र या संविधानातल्या चैतन्याला महत्व न देण्यातच धन्यता मानली किंवा स्वतः पुरता संविधानाचा उपयोग करून घेण्याचेच काम त्यांनी केले. ज्या लोकशाही व्यवस्थेचे अतिशय मोठे वरदान संविधानामुळे प्राप्त होऊ शकले, ती लोकशाही लोकहिताच्या संरक्षणाऐवजी राज्यकर्त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी संविधानाचाही वापर करायला मागेपुढे पाहिले नाही म्हणूनच आज देशातील सत्तर टक्के ग्रामीण भाग धडपणाने विकसित झालेला नाही. विकासाचे किंवा प्रगतीचे मापदंड लावताना लोकशाहीच्या तत्त्वांचे पालन तर झाले नाहीच. परंतु संविधानाने केलेल्या मार्गदर्शनाचाही योग्य तो विचार केला गेला नाही. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून जर देशाची सर्व प्रकारची ध्येयधोरणे राबवली गेली असती तर आजचा प्रजासत्ताक पूर्णपणे प्रजेच्या हिताचाच विचार करणारा ठरला असता. परिस्थिती मात्र उलट दिसून येते. घराणेशाही आणि राजकारणाचा व्यवसाय समजून उपयोग करण्याच्या प्रवृत्तीमुळे प्रजासत्ताकाचे एकाअर्थी अवमूल्यन केले गेले. गेल्या सत्तर वर्षामध्ये राजसत्ताक व्यवस्थाच अस्तित्वात पाहायला मिळाली. कारण लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सत्तेवर येत असले तरी तेच तेच लोक पुन्हा पुन्हा राज्यकारभार करीत राहिले. म्हणजे प्रजेने निवडून दिलेले प्रतिनिधी हे त्याचे केवळ दिखाऊ स्वरुप राहिले.

### स्वातंत्र्याची मूलतत्त्वे

प्रजासत्ताकाच्या संकल्पनेमध्ये सतत नवनवीन प्रतिनिधी निवडून दिले जाणे अपेक्षित आहे. म्हणजे मग समाजातल्या सर्व घटकांना समान प्रतिनिधीत्व मिळू शकते आणि त्या घटकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब प्रजासत्ताकामध्ये दिसून आले असते. आज प्रजासत्ताक दिन साजरा करताना बऱ्याच गोष्टींमधील उणिवा लक्षात घेतल्या पाहिजेत. केवळ आपण संविधान स्वीकारले म्हणजे प्रजासत्ताक झालो, असे म्हणून समाधान मानून घेता येणार नाही. तर ज्या संविधानाने सामान्यांच्या हितरक्षणाची काळजी घेतली त्या प्रजेच्या गरजा अजूनही पूर्ण झालेल्या नाहीत. मग एकाअर्थी प्रजासत्ताक राष्ट्र होऊनही आपण पूर्ण प्रजासत्ताक होऊ शकलेलो नाही. हे सत्य देखील नाकारता येणार नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून ते हजारो बालकांच्या कुपोषणापर्यंत किंवा दरवर्षी दीड लाख लोकांचे रस्ते अपघातात मृत्यू होण्यापर्यंतच्या अनेक घटना विचार करायला भाग पाडतात. कारण प्राथमिक गोष्टीदेखील पूर्ण करण्यास राज्यकर्ते यशस्वी होऊ शकत नसतील तर स्वतःला प्रजासत्ताक म्हणून घेण्याचा नैतिक अधिकारही आपल्याला पोहचत नाही. स्वातंत्र्य, समता बंधूता या तीन तत्वांचा अंगिकार करताना जगण्याच्या स्वातंत्र्याची प्रेरणा टिकून राहावी आणि समाजाचे सामाजिक भावनेचे समर्थन व्हावे हाच हेतू अभिप्रेत होता. पण आज तो पूर्णपणाने सिध्द झाला आहे असे वाटत नाही. सत्तरवर्षाचा काळही फारमोठा कालावधी नसला तरी छोटाही काळ नाही, निदान सामान्य जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे आणि आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्यातून जगण्याचे मूलभूत अधिकारही जपले जावेत अशीच एक व्यवस्था आहे. भारतासारख्या विविध प्रांत, भाषा, जाती असलेल्या देशात सर्व दृष्टीने एकात्मता टिकवून ठेवणे हे काही साधं सोपं काम नाही. म्हणूनच देशातल्या सर्व प्रांतांचे सर्व घटकांचे समाधान व्हावे हा हेतू संविधानाच्या रचनेतून साधला गेला प्रजासत्ताकाने केलेले हे आवाहन राज्यकर्त्यांनी किती प्रमाणात अमंलात आणले आणि प्रत्येकाला आपल्या देशाबरोबर असलेल्या संबंधांचा अभिमान दृढमूल झाला, याचाही आढावा घेणे महत्वाचे ठरते.

### सामान्यांच्या अपेक्षा

गेल्या सत्तर वर्षापासून प्रजासत्ताक दिन आपण उत्साहाने साजरा करतो. यानिमित्ताने आपल्या देशाच्या समृध्दीचे, प्रगतीचे, स्वावलंबनाचे दर्शन घडत असते. परदेशी पाहुण्यांना बोलवून आपल्या प्रगतीचे कौतुकही करून घेत असते. परंतु हा सगळा औपचारिकपणा ठरतो. यापेक्षा गावागावामध्ये आणि खेड्यांमधून सामान्य जनतेला उपयोगी पडणारे किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये परिवर्तन घडवणाऱ्या गोष्टींचे दर्शन घडवले गेले, तर ते अधिक उपयुक्त ठरू शकेल. जगातल्या ज्या ज्या राष्ट्रानी स्वतःला प्रजासत्ताक म्हणून घोषित करून घेतले त्या त्या देशांमधील सामान्य जनतेला सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. कारण तिथल्या राज्यकर्त्यामध्ये सत्तालोलुपता नव्हती. भारतामध्ये मात्र या सत्तालोलुपतेमुळे प्रजासत्ताकाचे तत्त्व संपूर्णपणे साकार होऊ शकले नाही. म्हणूनच या गोष्टींची जाणीव राज्यकर्त्यांना करून देणे गरजेचे ठरते. प्रजासत्ताकदिन साजरा करीत असताना आतापर्यंत केलेल्या कामांचे सिंहावलोकन केले गेले पाहिजे. राज्यकारभारामध्ये सामान्य जनतेचा अधिकाधिक सहभाग होईल राजकारण्यांची घराणी अशी तयार होणार नाहीत, अशा निवडणूक सुधारणा राबवल्या गेल्या पाहिजेत. अशा अपेक्षांची लवकरात लवकर पूर्तता व्हावी यासाठी प्रजासत्ताक चिरायू व्हावा अशा शुभेच्छा दिल्या पाहिजेत.